**ठळक बातम्या**

- स्थलांतरित कामगारांना मोफत दिल्या जाणाऱ्या पाच किलोच्या FTL एलपीजी सिलेंडरचं वाटप दुप्पट करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय

- आंध्र प्रदेश पुनर्रचना सुधारणा विधेयकाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची मंजुरी

- आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत ललित सेहरावत अंतिम फेरीत दाखल

**आणि**

- होर्मुझची सामुद्रधुनी आज रात्रीपर्यंत खुली केली नाही तर इराणवर हल्ला करण्याचा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा इशारा

**<><><><><>**

स्थलांतरित कामगारांना मोफत दिल्या जाणाऱ्या पाच किलोच्या FTL एलपीजी सिलेंडरचं वाटप दुप्पट करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचे सचिव डॉ. नीरज मित्तल यांनी याबाबत सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहिले आहे.

FTL अंतर्गत दिलं जाणारे पाच किलोचे एलपीजी सिलिंडर स्थलांतरित कामगारांना देण्यासाठी राज्य सरकारांना आणि त्यांच्या अन्न व नागरी पुरवठा विभागांना उपलब्ध करून दिले  जातील. यासाठी तेल विपणन कंपन्यांचे सहकार्य घेतलं जाईल, असं या पत्रात नमूद केलं आहे. वाढीव वाटप हे स्थलांतरित कामगारांना दिल्या जाणाऱ्या सिलिंडरच्या सरासरी दैनंदिन पुरवठ्यावर आधारित असेल. ही सुधारित मर्यादा मार्चमध्ये जाहीर केलेल्या २० टक्क्यांपेक्षा जास्त

असल्याचं पेट्रोलियम मंत्रालयाने सांगितलं. २३ मार्चपासून आतापर्यंत सुमारे सहा लाख ७५ हजार इतके पाच किलोच्या एलपीजी सिलिंडरची विक्री झाली आहे.

**<><><><><>**

आज जागतिक आरोग्य दिवस साजरा केला जात आहे. उत्तम आरोग्यासाठी चांगल्या सवयी लागाव्यात याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशानं हा दिवस साजरा केला जातो. विज्ञानाच्या सोबतीनं **आरोग्यासाठी एकत्र येऊ या** अशी यावर्षीची संकल्पना आहे.

दरम्यान, आजच्या जागतिक आरोग्य दिवसानिमित्तानं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज सेवेसाठी आणि निरोगी जगासाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या सर्वांचे आभार समाज माध्यमावरील संदेशातून मानले आहेत. निरोगी समाज उभारण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. तसंच आरोग्य व्यवस्थांना अधिक बळकट करण्यासाठी आणि प्रत्येक व्यक्तीच्या कल्याणाला प्राधान्य देण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन प्रधानमंत्र्यांनी केलं.

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याणमंत्री जगत प्रकाश नड्‌डा यांनीही डॉक्टर, नर्स आणि आरोग्य सेवेत कार्यरत असलेल्या सर्वांचे आभार मानले आहेत. आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्यांमुळे देशाची आरोग्य व्यवस्था मजबूत असल्याचं नड्‌डा यांनी समाज माध्यमावरील संदेशात नमूद केलं आहे.

**<><><><><>**

मानवी शरीरासाठी योग ही एक समग्र जीवनशैली असून यातून मानसिक शांती, शारीरिक सुदृढता आणि सकारात्मक जीवनदृष्टी मिळते, असं प्रतिपादन केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी केलं. बुलढाणा जिल्ह्यात लोणार सरोवराच्या काठावरील छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात, आयोजित केलेल्या

योग महोत्सवाचं उद्घाटन जाधव यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. आजच्या वेगवान आणि तणावपूर्ण जीवनशैलीत योगाचे महत्त्व अधिकच वाढलं आहे, असंही जाधव यावेळी म्हणाले.

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर उलटगणना उपक्रमाचा भाग म्हणून हा महोत्सव होत आहे. यावेळी एकाच वेळी सहा हजार लोकांनी त्रिकोणासन हे आसन करुन एका नव्या विक्रमाची एशियन बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद केली.

**<><><><><>**

गुरु तेग बहादुर यांच्या प्रकाश पर्वानिमित्त उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे. न्याय, करूणा आणि सलोखा यांची शिकवण त्यांनी दिली असं उपराष्ट्रपतींनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही गुरु तेग बहादूर यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. गुरु तेग बहादूर यांचं जीवन म्हणजे निर्भीडपणा, त्याग आणि माणुसकी यांचं मूर्तिमंत उदाहरण असल्याचं मोदी यांनी म्हटलं आहे. प्रतिकूल परिस्थितीतही सत्य, श्रद्धा आणि प्रतिष्ठा यांचं रक्षण करण्यासाठी ते अविचल राहिले, असं मोदी यांनी आपल्या संदेशात नमूद केलं आहे. भारतीय संस्कृती आणि मानवता यांचं रक्षण करण्यासाठी गुरु तेग बहादूर यांनी सर्वोच्च बलिदान दिलं, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी श्रद्धांजली अर्पण करताना म्हटलं आहे.

**<><><><><>**

आंध्र प्रदेश पुनर्रचना सुधारणा विधेयक, २०२६ ला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंजुरी दिली आहे. याअंतर्गत, अमरावतीला आंध्र प्रदेशची एकमेव आणि कायमस्वरूपी राजधानी म्हणून अधिकृतपणे घोषित करण्यात आलं आहे. गेल्या आठवड्यात संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान लोकसभा आणि

राज्यसभेने हे विधेयक मंजूर केलं होतं. दिवाळखोरी आणि नादारी संहिता सुधारणा विधेयक, २०२६ ला देखील राष्ट्रपतींची मंजुरी मिळाली आहे.

**<><><><><>**

किर्गिझीस्तान मध्ये बिशकेक इथे सुरु असलेल्या आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत पुरुषांच्या ग्रीकोरोमन प्रकारातल्या ५५ किलो वजनी गटात भारताच्या ललित सेहरावतने चीनच्या झुईंग शी याला हरवून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. आता सुवर्णपदासाठी ललितची लढत गेल्या वर्षीचा कांस्यपदक विजेता असलेल्या उझबेकिस्तानचा इख्तियार बोटिरोव्ह याच्याशी होणार आहे.

परंतु याच प्रकारात ७७ किलो वजनी गटात भारताचा अमन आणि ८७ किलो वजनी गटात सुनील कुमार यांना त्यांच्या उपांत्य फेरीत पराभव पत्करावा लागल्यामुळे आता त्या गटात भारताचं रौप्यपदक हुकलं आहे. आता कांस्यपदकासाठी अमनचा सामना दक्षिण कोरियाच्या येओन्ग हुंग नोह बरोबर होईल.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आजचा सामना राजस्थान रॉयल्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात होणार आहे. गुवाहाटी इथे बसरपारा मैदानावर संध्याकाळी साडे सात वाजता सामन्याला सुरुवात होईल. दरम्यान, पंजाब किंग्ज आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्या दरम्यान कोलकात्याच्या ईडन गार्डन्स मैदानावर काल खेळला गेलेला सामना पावसामुळे अर्धवट राहिला. यामुळे कोलकाता नाईट रायडर्स संघाला पहिल्या गुणाची कमाई झाली.

**<><><><><>**

स्पेनमधल्या ग्रॅनाडा इथे होत असलेल्या आय एस एस एफ रायफल आणि पिस्तुल जागतिक चषक स्पर्धेत आज भारतीय नेमबाजांच्या सामन्यांना सुरुवात होत आहे. पिस्तुल मिश्र प्रकारात पलक गुलिया आणि मुकेश नेलावल्ली तसंच

सैन्यम आणि  उज्ज्वल मलिक या जोड्या सहभागी होत आहेत. १० मीटर एयर रायफल मिश्र प्रकारात सोनम मस्कर-गजानन खंडागळे  आणि  श्रुति- अर्शदीप सिंह भारताचं प्रतिनिधित्व करतील.

<><><><><>

दूरचित्रवाणी वाहिन्यांचे टीआरपी येत्या चार आठवड्यांपर्यंत प्रकाशित करू नयेत, असे निर्देश केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं श्रोता संशोधन परिषदेला दिले आहेत. पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर काही वाहिन्यांवर अनावश्यक संवेदनशील दृश्य आणि काल्पनिक बातम्या दाखवल्या जात असल्याचं आढळून आल्यानं हा निर्णय घेण्यात आला आहे. अशा प्रसारणामुळे नागरिकांमध्ये भीती निर्माण होऊ नये, हा त्यामागचा उद्देश आहे.

<><><><><>

पश्चिम बंगालमध्ये जर भाजपा सत्तेत आली तर सर्व घुसखोरांना परत पाठवलं जाईल, असं भाजपा नेते आणि केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. आसाममधल्या पाथरकांडी इथं आयोजित निवडणूक प्रचार सभेत ते बोलत होते. काँग्रेसनं आसामच्या बराक व्हॅली परिसरात घुसखोरांना आश्रय दिल्याचा आरोप त्यांनी केला. काँग्रेसनं बराक व्हॅलीच्या विकासाकडे संपूर्ण दुर्लक्ष केलं आणि त्या भागासाठी कोणतीही ठोस कामं केली नाहीत, अशी टीका त्यांनी केली. पुढील पाच वर्षांत आसाम विकासाच्या नव्या उंचीवर पोहोचेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

<><><><><>

देशातल्या धार्मिक स्थळांवर महिलांबाबत होणाऱ्या कथित भेदभावासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात ९ न्यायाधीशांच्या घटनापीठासमोर सुनावणी सुरू आहे. विविध धार्मिक स्थळांवर महिलांप्रति होणारा भेदभाव आणि विविध पंथांमधल्या धार्मिक स्वातंत्र्याच्या व्याप्तीशी संबंधित दाखल झालेल्या याचिकांवर सुनावणी सुरू

आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील या पीठात बी. व्ही. नागरत्न, एम. एम. सुंदरेश, अहसानुद्दीन अमनुल्ला, अरविंद कुमार, ऑगस्टीन जॉर्ज मसिह, प्रसन्न वराळे, आर. महादेवन आणि जॉयमाल्य बागची या न्यायाधीशांचा समावेश आहे.

**<><><><><>**

इराणने आज रात्री आठ वाजेपर्यंत होर्मुझची सामुद्रधुनी खुली करून कराराला सहमती दिली नाही तर इराणच्या वीजनिर्मिती प्रकल्पांसह महत्त्वाच्या पायाभूत सुविधांवर हल्ले करण्याचा इशारा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. संघर्ष वाढला तर आखाती देशांमधल्या उर्जा प्रकल्पांना लक्ष्य करण्यात येईल असं प्रत्युत्तर इराणने दिलं आहे. दरम्यान, इराणने सौदी अरेबियावर पुन्हा क्षेपणास्त्र हल्ले केले आहेत. इराणने आज पहाटे आपल्या पूर्व भागात डागलेली सात बॅलेस्टिक क्षेपणास्त्रं नष्ट केल्याचं सौदी अरेबियानं म्हटलं आहे.

**//<><><><><>//**